**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठातील मानव संसाधन विकास केंद्रास राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्राचा दर्जा
## विद्यापीठाच्या नावलौकिकात भर
## १ सप्टेंबर पासून कौशल्य विकास विषयावरील ऑनलाईन उजळणी वर्गाचे आयोजन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील मानव संसाधन केंद्रास केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्राचा दर्जा प्रदान केला आहे. हा दर्जा देशातील काही निवडक अग्रगण्य संस्थांनाच प्राप्त झाला असून त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा समावेश आहे.

आगामी काळात कुशल मनुष्यबळ निर्मिती व रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याची बाब लक्षात घेता विद्यापीठातील मानव संसाधन विकास केंद्रांतर्गत राष्ट्रीय ज्ञानस्त्रोत केंद्राच्या माध्यमातून दि. १ सप्टेंबर, २०१९ पासून कौशल्य विकास विषयावरील 'स्कील्स फॉर न्यू एज्युकेशनल आर्किटेक्चर' या अर्पित संवर्गातील ऑनलाईन उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर ऑनलाईन प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देवून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास निर्माण करण्याचे तंत्र आत्मसात करण्याची संधी प्राध्यापकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदर अर्पित संवर्गातील ऑनलाईन उजळणी वर्ग हा केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे www.swayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उजळणी वर्गाची सविस्तर माहिती विद्यापीठ संकेतस्थळ www.sgbau.ac.in व मानव संसाधन विकास केंद्राचे संकेतस्थळ www.ascsgbau.ac.in यावर उपलब्ध आहे.

तरी ऑनलाईन उजळणी वर्गाला सर्व संबंधितांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, मानव संसाधन विकास केंद्राचे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर व केंद्राचे समन्वयक प्रा. सुहास पाचपांडे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २७/०८/२०१९.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,
आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी